मुद्रा यशोगाथा
नाव :- श्रीम.चित्रलेखा रमेश येलमुले, जि.चंद्रपूर
व्यवसाय :- ठोक भाजीपाला विक्रेत्या

## पंतप्रधान मुद्रा बँक योजनेमुळे भाजीपाल्याच्या धंदयाला बरकत

लाभार्थ्याचे मनोगत :- गेल्या अनेक वर्षापासून भाजीपाल्याच्या ठोक उद्योगामध्ये काम करतांना अनेक गोष्टी घेण्यासाठी हिंमत होत नव्हती. भाजीपाल्याच्या धंदयामध्ये रोजच पदरचा पैसा मोडून रोजचा व्यवहार पूर्ण करावा लागत होता. अशावेळी दुकानासाठी आवश्यक असणा-या वस्तू, नवीन बैठकव्यवस्था व भाजीपाला मोजण्यासाठीच्या काही साहित्याची खरेदी करण्याचे मागे पडून जात होते. अनेकवेळा पती सोबत व्यवसायात साथ देतांना एखादी चांगली रक्कम हाताशी आल्यानंतर आपल्या धंद्याच्या वृध्दीसाठी काही करता येईल का ? असा विचार नेहमी येत होता. मात्र दोन मुलांचे शिक्षण आणि रोजच्या नगदीच्या व्यवहारात रक्कम बाजूला राहत नव्हती. मुद्रा बँकेबद्दल अनेकांकडून ऐकले. पतीने देखील बँकेतून माहिती घेतली. अशा छोटया उद्योगाशीसाठी शिशू गटातील ५० हजार रुपयांचे कर्ज मिळू शकत असल्याचे सांगण्यात आले. बँकेने देखील आमचा प्रस्ताव मान्य केला. आमच्या भाजीपाल्याच्या धंद्याला पहिल्यांदा आर्थिक मदत झाली. धंद्याला हळूहळू बरकत आली. जसे कर्ज घेतले तसे परतही करीत आहोत. आम्ही नियमित परत फेड करत असल्यामुळे ताणही पडला नाही. मुद्रा बँक योजनेसारखी गरीबांना मदत करणारी योजनेचा लाभ घेता आल्याचे समाधान आहे.”

-------------